# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/03/2023 (शुक्रवार) दुपार

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत दीड किमी अंतरावर वार्ड क्रमांक एक खापरखेडा येथे दिनांक ०९/०३/२०२३ चे १२.४५ वा. ते १४.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, नमुद घटनास्थळी अवैधरित्या ट्रॅक्टर ट्रॉलीच्या साहाय्याने रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफने घटनास्थळी जावुन ट्रॉली क्रमांक एम. एच–४० ए.एम–२०८५ व ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. –४० ए एम –१८२९ चा चालक व **आरोपी नामे–दिनेश पांडुरंग कडू, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्रमांक चार खापरखेडा** हा त्यांचे ट्रॅक्टर मध्ये अवैधरित्या विनापरवाना नदीच्या पात्रातील रेतीची चोरटी वाहतूक करतांना मिळुन आले. ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये असलेल्या अर्धा ब्रास रेती किंमती अंदाजे ३०००/– रुपये ही घटनास्थळावरून चोरून पळून जातांना मिळून आल्याने पंचासमक्ष घटनास्थळावर सोडलेली रेती व ट्रॅक्टर क्रमांक एम एच–४० ए एम–१८२९ व ट्रॉली क्रमांक एम एच–४० एम.– २०८५ किंमती अंदाजे ५,००,०००/–रू. असा एकूण ५,०३,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– परि. पोउपनी मीनल एकनाथराव कापगते, पोस्टे खापरखेडा यांचे रीपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन ट्रॅक्टर ट्रॉली चालक आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक दिपक रेवतकर ब. नं १९८७ मो. नं. ९५४५५२३७३६ हे करीत आहे.

 

## चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील मौजा खैरी देशमुख येथे दिनांक ०९/०३/२०२३ चे ०७.३३ वा. दरम्यान आरोपी नामे— दुर्गेश संतोषराव परते, वय २३ वर्ष रा. नयनपुर जि. मंडला हा फिर्यादी नामे— प्रफुल उल्लासराव कउुठकर, वय ३२ वर्ष, रा. म्हसेपठार वार्ड क्र. ०३ याचे शेतात नौकर असुन यातील आरोपीने फिर्यादीचे शेतात ठेवलेली बारविलची चालु स्थितीत असलेली सि. आर. आय. कंपनीची जुनी मोटार किंमती अदाजे १०,०००/— रू. ची विकण्याकरीता चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३८१ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रमोद तभाने मो. क्र. ८६००४५८६७८ हे करीत आहे.

## विनयभंग

**१) पो.स्टे. सावनेर :–** दिनांक ०९/०३/२०२३ चे ११.३० वा. ते १२.०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी वय १३ वर्ष ७ महिने ५ दिवस ही दिनांक ०९/०३/२०२३ रोजी चे ११.३० वा. दरम्यान ती शाळेतुन तिच्या घरी परत आली व दरवाज्याची कडीकुंडी न लावता दरवाजा अर्धवट उघडुन घरामधील समोरील खोलीतील पलंगावर झोपली असता यातील आरोपी नामे– नरेश लक्ष्मण धुर्वे, वय ५० वर्ष रा. सर्वोदय नगर सावनेर हा तिच्या घरी आला व दरवाज्याची कडीकुंडी लावून तिला एक पप्पी दे असे बोलला ती घाबरुन जोरात ओरडली व त्याला घरुन जाण्यास सांगितले असता त्याने तिचे तोंड दाबले तिला दोन ते तिन थापडा गालावर मारल्या तिचा आवाज ऐकुन मोहल्ल्यात राहणारे नामे– लक्ष्मण खदवे, रामु यादव, जिवन यादव व इतर लोक हे घरासमोर आले व त्यांनी तिला आवाज दिला त्यांचा आवाज ऐकुन आरोपीने दरवाज्याची कडीकुंडी उघडली त्यानंतर त्यांनी आरोपीला घराबाहेर काढले व पोलीसांना माहीती दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ अ, ३२३, ४५२, भादवि बालकाचे लैगिक अपराध पासुन संरक्षण अधिनियम २०१२ कलम ८ पोक्सो कायद्याअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. सोनाली रासकर पोस्टे सावनेर मो. नं. ९०८२१९६०८० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान :–** दिनांक ०७/०३/२०२३ चे १४.०० वा. ते दिनांक ०८/०३/२०२३ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी /पिडीता वय ३० वर्ष ही दिनांक ०७/०३/२०२३ चे १४.०० वा. कपडे धुण्याकरीता नदीवर गेली असता तेथे आरोपी क्र. १) नामे– सुरज मारबते, वय २८ वर्ष व आरोपी क्र. २) अतुल मेश्राम, वय २२ वर्ष, दोन्ही रा . येसंबा नांदगाव ता. पारशिवनी जि. नागपुर हे त्या ठिकाणी हजर होते यातील आरोपी क्र. १ याने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व शारिरीक संबंध करू दे असे म्हटले तसेच दिनांक ०८/०३/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादीच्या मोबाईलवर आरोपी कं. १ याने दोन ते तिन वेळा फोन केले व शारिरीक सबंध करू दे असे म्हटले व त्याच दिवशी आरोपी क्र. २ याने फिर्यादीच्या मोबाईलवर फोन करून विनाकारण अश्लिल शब्दात शिवीगाळ केली त्यानंतर १५.०० वा. च्या दरम्यान आरोपी क्र. १ व २ हे फिर्यादीजवळ आले व आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे दोन्ही हात पकडुन हातातील बांगडया फोडुन टाकले व अश्लिल शब्दात शिवीगाळ करून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(अ), ३५४–अ (२) २९४ भादवी सह कलम ३(१) (डब्ल्यु) (A), ३(१)(डब्ल्यु) (AA), ३(२) (अं) अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ कायद्याअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास ठाणेदार पोस्टे कन्हान पोलीस निरीक्षक.मकेश्वर हे करीत आहे.

**३) पो.स्टे. मौदा** :– दिनांक २०/१२/२०२२ चे १०:४५ वा. दरम्यान नमूद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी/पिडीता वय १८ वर्ष ही नवप्रतीभा महाविदयालय सक्करदरा नागपूर येथे गेली असता आरोपी नामे– मोहन पुरूषोत्तम मांढरे, रा. टेमसना ता. कामठी हा फिर्यादीचे मागे आला व तिचे सोबत अश्लिल चाळे करत होता तेव्हा फिर्यादीने त्यास हटकले असता सदर आरोपीने फिर्यादीला अश्लील भाषेत बोलून धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ड), ५०६ भा.द.वि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राजू आंधळे ब. नं. ७२१ पो. स्टे. मौदा हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**